दिनांक 07/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 106

विषय – महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत विटा शहर पाणी पुरवठा प्रकल्प करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 07/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत विटा शहर पाणी पुरवठा प्रकल्प करणेकामी खालील निविदा ई दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) एस. व्हि. जाधव कन्स्ट्रक्शन प्रा. लि. | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 9.16% जादा दराने |
| 2) स्वस्तिक कन्स्ट्रक्शन. | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 10.50% जादा दराने |
| 3) अरिहंत कन्स्ट्रक्शन. | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 13.27% जादा दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदांचे वित्तीय बोलीचे तुलनात्मक दरपत्रक, कार्यालयीन अहवाल पहात, महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965चे कलम 317 (3) अन्वये प्राप्त अधिकारानुसार रकाना क्रमांक 6 मध्ये दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.16 टक्के जादा दराने निविदा भरलेली आहे. तरी सदर भरलेल्या निविदेच्या दराबाबत तडजोडीअंती संबधीत ठेकेदाराने निविदा रक्कमेच्या 4.94% जादा दराने देकार कळविला आहे. सदर निविदाधारक यांना मंजूरीची समज देवून नियमानुसार होणारे रक्कमेचे स्टॅम्प पेपरवर रितसर करारपत्र करून कार्यादेश देणेत यावेत. त्यानुसार मंजूर दराप्रमाणे कामे करून घेणेस व त्याची होणारी बीले अदा करणेस तसेच याकामी होणारे सर्व अनुषंगीक खर्चास शासन निर्णय क्रमांक एमयुएन- 2016/प्र.क्र.468/नवि18, दि. 20 मे 2022 अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, 1965 च्या (1965 चा महा. 40) कलम 340 च्या पोट-कलम (2) मधील उप नियम (इ) खंड (1) व्दारे प्रदान केलेल्या अधिकाराने विटा नगरपरिषद, विटाचा प्रशासक म्हणून यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मुख्याधिकारी यांना प्रधिकृत करणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा